**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा सरतपास शपथेवर फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.जी. घोबाळे यांचेमार्फत सुरु –**

**०१.** मी प्रकरणात आरोपीने मला दिलेला मूळ धनादेश दाखल केलेला आहे, आता मला तो दाखविणेत आला, त्यावर आरोपी यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे सदर धनादेशास **निशाणी क्र. ३८** देणेत येते. सदरचा धनादेश मी माझ्या बँकेत वटविण्यासाठी टाकला असता सदरचा धनादेश न वटता परत आलेला आहे व धनादेश न वटल्याचा मेमो मी दाखल केलेला आहे. सदर बँकेच्या रिर्टन मेमोवर व्यवस्थापकाची सही आहे व बॅकेचा शिक्का आहे. सदर मेमोस **निशाणी क्र.३९** देणेत येते. मी आरोपीला माझ्या वकीलामार्फत पाठविलेली रक्कम मागणीची नोटीसची स्थळप्रत दाखल केलेली आहे. सदर नोटीस मधील मजकूर बरोबर आहे त्यावर माझे विधीज्ञ व माझी सही आहे. सबब रक्कम मागणी नोटीसीस **निशाणी क्र.४०** देणेत येते. नोटीस पोस्टाने पाठविल्याची पावती दाखल केलेली आहे. सदर पावतीस **निशाणी क्र. ४१** देणेत येतो. आरोपीस रक्कम मागणीची नोटीस मिळाल्याची पोष्टाची पोहोच पावती मी दाखल केलेली आहे, त्यावर आरोपीची सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर पोष्टाच्या पोहोच पावतीस **निशाणी क्र. ४२** देणेत येते.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी व आरोपीचे विधिज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. आरोपीतर्फे आजरोजी अभिलेखावर निशाणी क्र. ३७ वरील अर्ज नामंजुर करण्यात आलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता आरोपीस फिर्यादी साक्षीदारास उलटतपास करण्याची पुरेपुर व अनेक संधी देण्यात आल्याचे स्पष्ट होते. असे असतानाही आरोपी या ना त्या कारणावरून प्रकरण लांबवत असल्याचे दिसुन येते. सबब फिर्यादी साक्षीदारास आरोपीतर्फे उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

दिनांक –२०/०५/२०२६

मजकूर Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM Date: 2026.05.20 12:48:56 +0530

(श्री.एम.बी.सोनटक्के)
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अंबाजोगाई

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM Date: 2026.05.20 12:49:02 +0530

(श्री.एम.बी.सोनटक्के)
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अंबाजोगाई.